आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- क्रूझ भारत अभियानाद्वारे पाच वर्षांत क्रूझवरून पर्यटन करणाऱ्यांची संख्या दुप्पट करण्याचं लक्ष्य

- जम्मू-काश्मिर विधानसभा निवडणुकीत उद्या अखेरच्या टप्प्यात ४० मतदारसंघात मतदान

- ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**आणि**

- बांगलादेशाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात चौथ्या दिवसअखेर भारताकडे २६ धावांची आघाडी

**<><><><><><>**

राज्यातले होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याचे निर्णय राज्य सरकारनं आज घेतले. होमगार्डला मिळणारा कर्तव्य भत्ता ५७० रुपयांवरुन १ हजार ८३ रुपये होईल. कोतवालांना मानधनात १० टक्के वाढ आणि

अनुकंपा धोरण राज्य सरकार लागू करणार आहे. ग्राम रोजगार सेवकांना आता ७ हजार रुपये मानधन आणि प्रोत्साहन अनुदान दिलं जाणार आहे. याशिवाय विशेष शिक्षकांच्या ४ हजार ८६० पदांची निर्मिती करायला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठीचं सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्रीमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. मराठा आरक्षणासंदर्भात नेमलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारनं आज स्वीकारला. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. दरम्यान, देशी गायींना ‘राज्यमाता- गोमाता’ जाहीर करण्याचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. गोशालेतल्या देशी वंशांच्या गायींसाठी प्रति गाय प्रति दिन ५० रुपये अनुदान द्यायचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. सध्या राज्यात ८२८ नोंदणीकृत गोशाळा असून त्यात दीड लाखांहून अधिक गायी आहेत.

<><><><><><>

भारतीय पोलीस दलातल्या वर्ष २०२३ च्या तुकडीच्या परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात भेट घेतली. कायदा आणि सुव्यवस्था हा केवळ शासन व्यवस्थेचा पाया नसून तो आधुनिक राज्याचा आधार आहे, असं राष्ट्रपती मुर्मू प्रोबेशनरी अधिकाऱ्यांना संबोधित करताना म्हणाल्या. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित

असेल तरच आर्थिक आणि सामाजिक विकास शक्य आहे, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण केल्यानेच प्रगतीला अर्थ प्राप्त होतो , असंही राष्ट्रपती मुर्मू यावेळी म्हणाल्या.

<><><><><><>

क्रूझ भारत अभियानाद्वारे येत्या पाच वर्षांत क्रूझवरून पर्यटन करणाऱ्यांची संख्या दुप्पट करण्याचं ध्येय असल्याची माहिती केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिली आहे. मुंबई इथं या अभियानाची सुरुवात त्यांच्या हस्ते झाली, त्यावेळी ते बोलत होते. हा भारतातल्या समुद्री पर्यटन क्षेत्राचं पुनरुज्जीवन करण्याच्या प्रक्रियेतला मैलाचा दगड आहे. १ ऑक्टोबर २०२४ ते ३१ मार्च २०२९ या कालावधीत तीन टप्प्यांमध्ये हे अभियान राबवलं जाईल.

<><><><><><>

शहरी पायाभूत सुविधा, आणि निवासी भागातली हिरवाई सुधारण्यासाठी केंद्रसरकारनं गेल्या १०० दिवसात अनेक पावलं उचलली, असं केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांनी आज सांगितलं. ते नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. सरकारनं पहिल्या १०० दिवसात शहरी प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी दिली. शहरी भागातल्या १ कोटी गरीब आणि मध्यमवर्गिय कुटुंबांना वित्त सहाय्य पुरवणे हे त्यामागचं उद्धिष्ट होतं, असं ते म्हणाले.

गेल्या १० वर्षात देशभरातल्या आणखी २१ शहरांमधे मेट्रो सेवेचा विस्तार झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

झारखंडचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार आणि केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज रांची इथून  दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून  देशभरातल्या  अकरा हजार अंगणवाडी केंद्रांचं  उद्घाटन केलं. ॲनिमिया आजाराबद्दल  जागरूकता, 'पोषण भी पढाई भी', तसंच तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांवर लक्ष केंद्रित करणे, हा पोषण माह चा उद्देश आहे , असं केंद्रीय  महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यावेळी  म्हणाल्या.

<><><><><>

भारतीय हवाई दलाचे प्रमुख म्हणून एअर मार्शल अमरप्रीत सिंग यांनी आज कार्यभार स्वीकारला. १९८४ मधे हवाई दलात समावेश झाल्यानंतर त्यांनी सुमारे ४० वर्षाच्या कारकिर्दीत विविध पदांवर काम केलं. फेब्रुवारी २०२३ पासून हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून ते काम करत होते. एअर चीफ मार्शल व्ही आर चौधरी आज सेवानिवृत्त झाले. त्यांचा कार्यभार आता अमरप्रीत सिंग यांच्याकडे आला आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. उद्या सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून मतदान सुरळीत आणि शांततेत व्हावं यासाठी चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. या टप्प्यात उद्या ७ जिल्ह्यातल्या ४० विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होईल. ४० जागांपैकी १६ जागा काश्मीर विभागात तर २४ जागा जम्मू विभागात आहेत.

**<><><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांसोबत नुकत्याच झालेल्या चकमकीनंतर आज सुरक्षा दलांनी सलग तिसऱ्या दिवशी व्यापक शोधमोहीम राबवली.

**<><><><><><>**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी आज हरयाणा विजय संकल्प यात्रेचा प्रारंभ केला. हरयाणातली लढत ही भाजप आणि काँग्रेसमध्ये असल्याचं राहुल गांधी अंबाला इथल्या जाहीर सभेत म्हणाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बावनी खेरा इथल्या मतदारसंघात जाहीरसभा घेतली. भाजपाने गेल्या १० वर्षांत हरयाणाच्या विकासासाठी काम केलं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

तिरुपतीतल्या प्रसादाच्या लाडूत भेसळयुक्त तुपाचा वापर झाल्याचा अद्याप काहीही पुरावा नसल्याचं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आहे. लाडूमध्ये प्राणिजन्य चरबीच्या भेसळीबाबत खात्री होण्यापूर्वीच आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत विधान करण्याची आवश्यकता नव्हती, घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीने जबाबदारीने वागावं, आणि देवाला राजकारणापासून दूर ठेवावं, असं मतही न्यायालयानं नोंदवल्याचं, वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. याप्रकरणी पुढची सुनावणी येत्या तीन तारखेला होणार आहे.

**<><><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके हा चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दलचा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढच्या महिन्यात होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज ही घोषणा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिथुन चक्रवर्ती यांचं पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. मिथुन हे सांस्कृतिक आदर्श आहेत, असे गौरवोद्गारही प्रधानमंत्र्यांनी काढले.

दरम्यान, मिथुन चक्रवर्ती यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला असून हा पुरस्कार आपले कुटुंबीय आणि चाहत्यांना अर्पण केला आहे.

<><><><><><>

कानपूर इथं सुरू असलेल्या बांगलादेशाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज चौथ्या दिवशी भारतानं २६ धावांची आघाडी घेतली. बांगलादेशाचा पहिला डाव आज २३३ धावांवर आटोपला. मोमीनूल हकची नाबाद शतकी खेळी वगळता इतर कुणालाही खेळपट्टीवर टिकून राहता आलं नाही. भारतातर्फे जसप्रित बुमराहनं ३, तर आर. अश्विन, आकाशदीप आणि मोहम्मंद सिराज यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. त्यानंतर भारतानं पहिल्या डावात ९ बाद २८५ धावा झाल्या असताना डाव घोषित केला. दुसऱ्या डावात आजचा खेळ थांबला तेव्हा बांगलादेशाच्या २ बाद २६ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

सर्वत्र सुरू असलेल्या स्वच्छता अभियानासंदर्भात अहमदनगरमध्ये राहणारा विद्यार्थी साईनाथ टेकाळे यानं केलेलं आवाहन आता ऐकूया.

**होल्ड .. बाईट- साइनाथ टेकाळे**

**<><><><><><>**

सोनं तारण कर्ज देणाऱ्या संस्थांकडून विविध दिशानिर्देशांचं वारंवार उल्लंघन होतंय. या त्रुटी तत्काळ दूर करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेनं या संस्थांना दिले आहेत. या निर्देशांचा कार्यपालन अहवाल ३ महिन्यात सादर करण्याचे आदेशही रिझर्व्ह बँकेनं दिले. ग्राहकांच्या अनुपस्थितीत दागिन्यांचं मूल्यांकन, दागिन्यांच्या लिलावात अपारदर्शकता, कर्ज वितरण करताना आवश्यक खबरदारीची कमतरता यासारखी निरीक्षण बँकेनं नोंदवली आहेत.

**<><><><><><>**

नेपाळमध्ये संततधार पावसाने आलेल्या पूर, भूस्खलन यासारख्या नैसर्गीक संकटामुळे आतापर्यंत २०९ जण मृत्यूमुखी पडले आहेत.

**//<><><><><><>//**